# कृषि विभाग,

# जिल्हा परिषद कोल्हापूर

# कै.बळीराम देसाई देशी वाण संवर्धन योजना

**प्रस्तावना :**

कोल्हापूर जिल्हा हा खरीपाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. यात प्रामुख्याने भात,भुईमुग,सोयाबीन ही अन्नधान्याची व गळीतधान्याची पिके असून ऊस हे प्रमुख नगदी पिक आहे. विविध पिकांच्या जिल्हयातील उत्पादकतेची राज्याच्या उत्पादकतेशी तुलना केली असता जिल्हयाची उत्पादकता जास्त असल्याचे दिसतें. ही जिल्हयाची उत्पादकता यापुढेही वाढविणेस चांगला वाव आहे. उत्पादकतेत वाढ करीत असताना जमिनीची सुपिकता टिकवून उत्पादन वाढविणेही गरजेचे आहे. शेतक-यांनी सुधारित तंत्रज्ञानाने व शिफारशींच्या आधारे लागवड केल्यास उच्च उत्पादकता साध्य करणे शक्य आहे. ऊसाबरोबरच पर्यायी भाजीपाला पिके ऊसात आंतरपिके घेतल्याने भाजीपाला पिक क्षेत्रात वाढ होवून त्यामधून भाजीपाल्याचे प्रचंड उत्पादन घेता येण् शक्य आहे.

भाताच्या उत्पादनात अग्रेसर असलेला कोल्हापूर जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये

पिकविला जाणा-या सुवासिक भाताच्या वाणासाठी सुयोग्य नियोजन,पिक लागवडीबाबत मार्गदर्शन, मार्केटिंगबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न केले तर निश्चितच शेतक-यांना जादा आर्थिक लाभ मिळणार आहे.

**शेतीपुढील संकटे :**

शेतीच्या आवर्तनात आज अनेक स्थितंतरे येत आहेत. जगाची बाजारपेठ आता सर्वांसाठी खुली होत आहे.शेतकरी हाच देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. ही आव्हाने पेलण्यासाठी शेतकरी अधिक सक्षम झाला पाहिजे. तथापि तरीदेखिल पावसाचे अनिश्चित स्वरूप व दिवसेंदिवस कमी होणारे प्रमाण, शेतजमिनीचा कमी असलेला आकार, प्रशिक्षित मजूरांची कमतरता,रासायनिक खत,औषधांचे वाढणारे दर व वेळेवर उपलब्धता या बाबी शेतक-यापुढे प्रकर्षाने भेडसावतात.

या सर्वांचा विचार करता आज पारंपारिक पिक पध्दतीकडून पर्यायी पिकांकडे जाणे,उपलब्ध जमिनीची सुपिकता टिकवून उत्पादकता वाढविणे, कमीत कमी क्षेत्रातून जास्तीत जास्त उत्पादन घेणे, रासायनिक खताचा वापर कमी करुन सेंद्रीय शेतीची अवलंब करणे, हाच एक मार्ग आहे.



**कृषि विभागाचे प्रयत्न :**

यासाठी जिल्हयातील शेतक-यांना हगांमानुसार पिकाची शास्त्रोक्त माहिती देणे, व सुधारीत तंत्रज्ञान प्रसार,रासायनिक खत वापर कमी करुन सेंद्रीय शेतीची अवलंब करणेबाबत प्रशिक्षण देणे, याबरोबरच विविध केंद्र व राज्यपुरस्कृत तसेच जिल्हा परिषद सेस फंडातील अनेक वैशिष्ठयपूर्ण योजना प्रभावीपणे कृषि विभागामार्फत निरंतर राबविल्या जात आहेत. यामध्ये गेल्या २ वर्षापासून जिल्हामध्ये राबविले जाणारे राजर्षी शाहू कृषि माहिती व तंत्रज्ञान अभियान जिल्हयातील शेतक-यांना आदर्शवत ठरले असून त्याचे दृश्य परिणाम पहावयास मिळतात.

**आजरा तालुका भौगोलिक परिस्थिती :**

आजरा तालुका कोकण विभागाचे प्रवेशव्दार असून तालुक्याचा पश्चिम विभाग हा डोंगराळ व अतिपावसाचा तसेच जांभ्या दगडाच्या तांबडया मातीचा आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम टोकाला वसलेला आणि तळकोकणाशी साध्यर्म्य असणारा हा आजरा तालुका. या विभागाचे सरासरी पर्जन्यमान ३५०० मिमी.इतके आहे. तालुक्याचे एकूण भैागोलिक क्षेत्र ५४८७२ हेक्टर आहे.तालुक्यात भात हे मुख्य पीक आहे. या पिकाखाली एकुण ९७०० हेक्टर क्षेत्र आहे. या विभागातील वातावरण भात पिकास पोषक असे आहे.

**तालुक्यातील भात पिकाच्या स्थानिक जाती :**

अनेक सुधारित संकरित भात वाणाबरोबरच काही स्थानिक भात जातींची या तालुक्यात लागवड केली जाते. या स्थानिक भात जातीमध्ये आज-याची खासियत असणा-या परंपरागत देशी, सुवासिक भात वाणामध्ये घनसाळ,काळा जिरगा,चंपाकळी, जोंधळी, कोतमीर साळ, मासाड,इरकल सोमसाळ,वस्ताळ,मासाड,एडसाळ, वागसाळ,या व अशा प्रकारच्या एकूण २५ जुन्या भात जातींची लागवड या तालुक्यात केली जात होती. त्यापैकी काही वाण आता लोप पावले असून त्यापैकी काही वाण आता आस्तित्वात आहेत पण तेही लोप पावणेच्या मार्गावर आहेत.

**आजरा घनसाळ** :



आजरा म्हटले की सर्वप्रथम आठवतो तो सर्वदूर लौकीक पोहोचलेला सुवासिक आजरा घनसाळ तांदूळ. सध्या बाजारात उपलब्ध असणारे सुवासिक वाण उदा.बासमती, आंबेमोहोर,इ.च्या तुलनेत जादा पौष्टिक व दर्जेदार आजरा घनसाळ ही भात जात आहे.

**घनसाळची वैशिष्ठे :**

- हा सुवासिक वाण आहे.
- हा वाण हेक्टरी उत्पादनात कमी, पण यास अधिक भाव मिळतो.
- पश्चिम घाट क्षेत्रामध्ये उत्पादनक्षमता दिसून येते.
- जास्त कालावधीचा म्हणजेच १५० दिवसांचा कालावधीचा हा वाण आहे.
- या वाणास काढणीपर्यंत सतत गारव्याची आवश्यकता भासते.
- तांदळाचा सुवास मोठमोठया शहरांसह परदेशातही परिचित आहे.

राज्यात केवळ आज-यात हा पारंपारिक वाण घेतला जातो. अन्य कोठेही याचे उत्पादन घेतले जात नाही.

**आजरा घनसाळ नामशेष होणेची कारणे :**

गेल्या अनेक वर्षापासून आपले नाव टिकवून ठेवलेला हा अस्सल वाण अस्तंगत व्हायला लागलाय. या वाणांस लागणारा **जादा कालावधी, मिळणारे कमी उत्पादन व उत्पादनखर्चाचा मिळणा-या कमी भावाचा** विचार करता येथिल शेतकरी सुधारित संकरित भात लागवडीकडे आकर्षित झाला. यामुळे या स्थानिक सुवासिक भात जातीचे वाण तालुक्यातून नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. गेल्या काही

वर्षापासून काही गावामध्ये काही एकर नव्हे तर काही गुंठयापुरता केवळ हौसेखातर घरगुती वापराकरिता या वाणाचे उत्पादन होत असल्याची स्थिती विचार करायला लावणारी आहे. आज-यातील केवळ २० गावातील मोजक्याच क्षेत्रावर म्हणजेच साधारणत: ६० ते ६५ हेक्टर क्षेत्रावर या वाणाची लागवड केली जाते. या शेतक-यांनीच जर उत्पादन थांबविले तर हा सुगंधी वाण पडदयाआड जाईल.

## जिल्हा परषिद सेस फंड सन २००९-१० अतंर्गत कै.बळीराम देसाई देशी वाण संवर्धन योजना

मा.श्री.बळीराम देसाई हे पंचायतराज स्थापनेपासून ते जिल्हा परिषदेत सलग ३५ वर्षे जिल्हा परिषद सदस्य होते. त्यांनी जिल्हा परिषद उपाध्यक्षासह विविध पदे भुषविली आहेत. शेतक-यांच्या हिताच्या विविध योजना त्यांनी आपल्या कार्यकालात राबविल्या. यामुळेच त्यांची आठवण म्हणून त्यांच्या नावाने धान्याचा वाण ओळखली जावी अशी जिल्हा परिषदेच्या सभागृहाची भावना झाली. याचमुळे जिल्हा परिषद सेस फंड सन २००९-१० अतंर्गत **कै.बळीराम देसाई देशी वाण संवर्धन योजना** घेणेत आली असून या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद सेस फंडातून रक्कम रू.५.०० लाखाच्या अनुदानाची या योजनेसाठी तरतूद जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये विदयमान कषि सिमती सभापती श्री. भारत पाटील यांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नाने करणेत आली.

### योजनेची व्याप्ती :

या योजनेअंतर्गत घनसाळ भात उत्पादन कार्यक्रम आजरा तालुक्यातील एकूण १२५ हेक्टर क्षेत्रावरील शेतक-यांसाठी राबविणेचे तसेच यासाठी पुरविणेत येणा-या बाबींसाठी ७५ टक्के अनुदान तर शेतकरी प्रशिक्षण व बियाणे पॅकींगसाठी १०० टक्के अनुदान देणेत येणेचे प्रस्तावित होते. घनसाळसाठी संपूर्ण सेंद्रीय पीक पध्दतीचा वापर करणे तसेच शुध्द घनसाळ बियाणे तयार करणे हेही उददीष्ट या योजनेअंतर्गत ठेवणेत आले. या योजनेचा प्रारूप आराखडा तयार करणेत आला असून यास कृषि समितीची ठराव क्रंमांक ५ दिनांक ०५/०६/२००९ अन्वये मान्यता घेणेत आली आहे.प्रारूप आराखडा खालीलप्रमाणे.



| तपशिल | परिमाण किलो/प्रति हेक्टर | दर प्रति किलो रू. | १२५ हेक्टरसाठी आवश्यकता | एकूण रक्कम रू. | ७५ टक्के अनुदान रक्कम रू. | २५ टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| भात बियाणे | ५० | ३७.५० | ६२५० किलो | २३४३७५ | १७५७८१.२५ | ५८५९३.७५ |
| भुसुधारक | ५० | ७.६ | ६२५० किलो | ४७५०० | ३५६२५ | ११८७५ |
| झिंक सल्फेट | २५ | ४२ | ६२५ किलो | १३१२५० | ९८४३७.५० | ३२८१२.५० |
| फेरस सल्फेट | २५ | ३६ | ६२५ किलो | ११२५०० | ८४३७५ | २८१२५ |
| बायोला | ३ | ४० | ३७५ किलो | १५००० | ११२५० | ३७५० |
| अझॅटोबॅक्टर | १ | २० | १२५ किलो | २५०० | १८७५ | ६२५ |
| सिलीकॉन | २० | २२.५० | २५०० किलो | ५६२५० | ४२१८७.५० | १४०६२.५० |
| **एकूण क्षेत्रिय स्तर** | | | | **५९९३७५** | **४४९५३१.२५** | **१४९८४३.७५** |
| प्रशिक्षण | | | | १५००० | १५००० | ० |
| बियाणे पॅकींग | | | | ३५४६८.७५ | ३५४६८.७५ | ० |
| **एकूण** | | | | **५०४६८.७५** | **५०४६८.७५** | **०** |
| **एकूण एकंदर** | | | | **६४९८४३.७५** | **५०००००** | **१४९८४३.७५** |

जि.प.सेस फंडाअंतर्गत होणारा सदरचा खर्च गटविकास अधिकारी पंचायत समिती आजरा यांचे स्तरावरून होणार असून सदर तरतूद पंचायत समिती आजराकडे वर्ग करणेत आली. हा उपक्रम केवळ आर्थिक निकषांवर न पाहता याचा वस्तुत: आजरा तालुक्यातील शेतक-यांच्यादृष्टीने एकूण सामाजिक उपयोग लक्षात घेवून उपयुक्तता पाहणे आवश्यक आहे. एकूणच या उपक्रमाव्दारे आजरा तालुक्यातील शेतक-यांना सामाजिक,आर्थिक लाभ अन्यन्यसाधारण असल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत हा उपक्रम राबविला जात आहे.

**यापूर्वीचे प्रयत्न :**

गतवर्षी या जातीच्या सवंर्धनासाठी जनजागृतीसाठी तालुक्यातील काही सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेतला होता. कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच जिल्हा परिषद यांचेकडून यास व्यापक प्रसिध्दी मिळालेने तालुका कृषि अधिकारी कार्यालय,आजरा, व इको फ्रेंडली चे अरूण देसाई यांनी दाथिल या गावामध्ये एकूण १८ एकराच्या या क्षेत्रावर शेतक-यांचे प्रबोधन करून या गावामधिल श्री.नामदेव पाटील, सयाजी निवळे, जानबा पाटील महादेव पाटकेर, गणपती मस्कर, जगन्नाथ परब, कृष्णा कदम, रामचंद्र पाटील,नारायण पाटील,आदी शेतक-यांच्या १० एकर क्षेत्रावर धनसाळ भात लागवड करणेत आली. रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रीय खतांचा वापर वाढविणेत आला. सुळेरान येथिल निवड पध्दतीने घेतलेल्या धनसाळ बियाण्याचां वापर करून भात रोपवाटिका तयार करून रोपे तयार करणेत आली. इको फ्रेंडली या संस्थेव्दारे शेतक-यांना प्रोत्साहनात्मक ५० टक्के अनुदानावर सेंद्रीय खतांचा पुरवठा करणेत आला.

**जनजागृती :**



कृषि खात्याच्या पुढाकाराने उत्पादनासाठी शेतक-यांत जाणीवजागृती मोहिम सुरू करणेत आली. यासाठी बचत भवन आजरा येथे कै.बळीराम देसाई देशी वाण संवर्धन योजना शेतकरी मेळाव्याचे आयोजन दिनांक ०६/०६/२००९ इ.रोजी करणेत आले.यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष

मा.भारतपाटील, उपविभागीय कृषि अधिकारी श्री.बेंदुगडे,तालुका कृषि अधिकारी श्री.पाठक,पंचायत समितीकडील कृषि अधिकारी, माजी उपप्राचार्य श्री. विजय बांधेकर, व आजरा तालुका शेतकरी विकास मंडळाचे अध्यक्ष श्री.संभाजी सावंत, तसेच आजरा तालुक्यातील अनेक प्रगतशिल शेतकरी उपस्थित होते. यावेळी सेंद्रीय भात लागवड मार्गदर्शिकेचे विमोचनही करणेत आले.

**शेतकरी निवड :**

यासाठी या योजनेचा प्रारूप आराखडा तयार करणेत आला. आजरा तालुक्यातील आज-यासह पेरणोली, दाभिल, आवंडी,लाडगाव,पोळगाव, वेळवटटी, मसोली, उचंगीसह ३० गावांतील एकूण १२५ हेक्टर क्षेत्रावरील एकूण ७५० शेतक-यांची निवड करणेत आली. एकटया दाभिल गावामध्ये ४५ एकर क्षेत्रावर योजना राबविली गेली आहे. एका शेतक-याला कमीत कमी २० आर क्षेत्रासाठी या योजनेखाली समाविष्ठ करणेत आलेले आहे.

**एका एकरसाठी बाबवार अनुदान प्रपत्र**

| तपशिल | परिमाण किलो/ प्रति हेक्टर | दर प्रति किलो रू. | एकरसाठी आवश्यकता | नग | एकूण रक्कम रू. | ७५ टक्के अनुदान रक्क्म रू. | २५ टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ |
| भात बियाणे | २० | ३७.५० | २०.०० | १ | ७५०.०० | ५६२.५० | १८७.५० |
| भुसुधारक | ५० | ३८०.०० | ५०.०० | १ | ३८०.०० | २८५.०० | ९५.०० |
| झिंक सल्फेट | ५ | २१०.०० | ५.०० | १ | २१०.०० | १५७.५० | ५२.५० |
| फेरस सल्फेट | ५ | १८०.०० | १०.०० | २ | ३६०.०० | २७०.०० | ९०.०० |
| बायोला | १ | ४०.०० | १.०० | १ | ४०.०० | ३०.०० | १०.०० |
| अझॅटोबॅक्टर | १ | २०.०० | १.०० | १ | २०.०० | १५.०० | ५.०० |
| सिलीकॉन | २ | ४५.०० | ८.०० | ४ | १८०.०० | १३५.०० | ४५.०० |
| | | | | | **१९४०.००** | **१४५५.००** | **४८५.००** |
| | | | | एकूण | **१९४०.००** | **१४३८.००** | **५०२.००** |

## बियाणे निवड व सेंद्रीय पीक पध्दतीचा अवलंब :



घनसाळमध्ये शुध्दतेचे प्रमाण फक्त ५० टक्के आहे. म्हणून पहिला टप्पा घनसाळ बियाणे तयार करणेचा प्रयत्न आहे. आतापर्यंत घनसाळचे सलग क्षेत्र कोठेही नव्हते. त्यामुळे शेजारच्या क्षेत्रातील इतर वाणाचे परागकण घनसाळच्या क्षेत्रात मिसळत होते. यामुळे घनसाळचे मुळ वाण नामशेष होणेच्या मार्गावर होते. यामुळे यंदा सलग बीजोत्पादन करून शेजारी दुसरे वाण नसावे असा प्रयत्न करणेत आला. अपेक्षित शुध्दता राखणेसाठी कृषि अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली बियाणे उत्पादन कार्यक्रम घेणेत आला आहे. आजरा घनसाळ बियाणे उत्पादनासाठी श्रमिक जनता सहायक मंडळ, कोयनानगर,रूरल कमिन्स खेपोली,जि.ठाणे,श्रमिक संस्था,मेढा-महाबळेश्वर येथे पाठविणेत आलेले आहे.

पारंपारिक शेती पध्दतीने व रासायनिक खत वापरामुळे उत्पादनात गुणात्मक  वाढ होत नाही. हा वाण रासायनिक खतापेक्षा सेंद्रीय खतांना जादा प्रतिसाद देतो. यासाठी आजरा घनसाळ सेंद्रीय पध्दतीने लागवड करणेसाठी प्रयत्न केला आहे.रासायनिक खतांचा कमीत कमी वापर करून सेंद्रीय पध्दतीने घनसाळ लागवडीवर भर देणेत आला आहे. एकटया दाभिल गावामध्ये १५ हेक्टर क्षेत्रावर संपूर्ण सेंद्रीय पध्दतीने घनसाळ उत्पादन घेणेत आलेले आहे.



## पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन :

सेंद्रीय घनसाळ तयार करणेसाठी लागवडीबाबतचे मार्गदर्शनासाठी गावोगावी पिकाच्या वाढीच्या विविध आवस्थांमध्ये पिक प्रात्यक्षिकांचे आयोजनही करणेत आले. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष, श्री.भारत पाटील, उपविभागीय कृषि अधिकारी एस.पी.बेंदुगडे,तालुका कृषि अधिकारी श्री.पाठक, मंडल कृषि अधिकारी श्री. आर.बी.गायकवाड, पंचायत समिती कृषि विभागाकडील श्री. दिनेश शेटये, श्री. माळगी यांनी उपस्थित राहून,मार्गदर्शन केले.

## दृश्य परिणाम : शिवार बहरलं.

या घनसाळचे पीक जोमदारपणे आलेले आहे. सुवासिक वातावरणाने मन क्षणार्धात प्रसन्न होत आहे. दुधाळलेल्या लोंबी काही दिवसांतच कापणीला येणार आहेत. ऐन फुलो-यात हा भात आक्टोबर हीट मध्ये सापडतो. त्यामुळे भाताचा संगधं कमी होतो. यंदा आकटोबर हीट जाणवली नाही. या पार्श्र्वभुमीवर कापणी,मळणीचे तांत्रिक मार्गदर्शन पुरविण्यासाठी कृषि विभाग सज्ज झाला आहे. या वर्षी वाढीसाठी मिळालेले योग्य वातावरण आणि शेतक-यांचा उत्साह शेतक-यांनी घेतलेल्या परिश्रमाचे हे फळ आहे.

या जातीच्या सवंर्धनासाठी तालुक्यातील विविध पदाधिकारी, सामाजिक संस्थां,कृषि विभागाकडून पुढाकार घेतला होता. कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच जिल्हा परिषद यांचेकडून या योजनेस व्यापक प्रसिध्दी मिळालेने वर्षाच्या सुरूवातीस या भात वाणास असणारा प्रति किलो रूपये १८ ते २२ दरावरून या भातास आता स्थानिक चौकशी करता रु. ४० ते ४२ प्रति किलो असा भाव मिळत आहे.ही योजना सुरू झाल्यापासून तालुक्यातील शेतक-यांचा नामशेष होणा-या या वाणाकडे बघणेचा दृष्टीकोन बदलला आहे. व त्यांचा घनसाळ लागवडीकडे कल वाढला आहे. यामुळे आजरा घनसाळ सारख्या दर्जेदार व सुवासिक भात जातीस जीवदान मिळणार असून या जातीचे संवर्धन होणार आहे.

**घनसाळचे मार्केटिंग :**



यापुढील टप्पा म्हणून घनसाळला गतवैभव मिळवून देवून आजरा घनसाळ म्हणून नविन ब्रॅन्ड बाजारात आणला जाणार आहे.कोल्हापूर, पुणे, मुंबई, दिल्ली येथील व्यापा-यांशी,मॉलधारकांशी याबाबत संपर्क साधणेत येणार आहे. यासाठी नियोजन करणेत आले असून याअंतर्गत घनसाळच्या मार्केटिंगसाठी महिला बचत गटांना ५० टक्के अनुदानावर इलेक्टॉनिक वजनकाटा, पॅकींग मशिन व प्लॅस्टिक पिशव्या पुरविणेचे प्रस्तावित आहे. हातसडीच्या पध्दतीने तयार केलेल्या घनसाळ तांदळाला मोठया शहरांमध्ये मोठी मागणी आहे. हातसडीमुळे सुवास टिकून राहतो. उलट मिलमध्ये पॉलीश केल्याने त्याचा सुवास कमी होतो. हातसडीच्या तांदळाला चांगला दर मिळाल्याने शेतक-यांचा अधिक फायदा होतो.म्हणून सदर तांदूळ राईस मिल मध्ये कांडण्याऐवजी हातसडीने तयार करणे शक्य होते का हेही आजमावणेचे प्रयत्न सुरू आहेत.

**आभार :**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जयश्री भोज, जि.प.अध्यक्ष, नानासाहेब गाठ, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, श्री.भारत पाटील, उपविभागीय कृषि अधिकारी एस.पी.बेंदुगडे,तालुका कृषि अधिकारी श्री.पाठक, पंचायत समिती कृषि विभागाकडील श्री. माळगी सकाळचे सहयोगी संपादक शिवाजी पाटील, जयवंतराव शिंपी, सभापती नंदा कांबळे, गटविकास अधिकारी श्री.रावसाहेब चव्हाण, जि.प.सदस्या,अलका शिंपी,अंजनाताई रेडेकर, सरपंच राजश्री पोवार, यांचे सहकार्य लाभले.

या योजनेसाठी सुरवातीपासूनच आग्रही राहून योजनेस मूर्त रूप देणेकामी जिल्हा परिषद उपाध्यक्ष, श्री.भारत पाटील यांनी अपार कष्ट घेतले आहे. त्यांच्याबरोबरच तालुका कषि अध्किारी कार्यालयाकडील मंडल कृषि अधिकारी श्री. आर.बी.गायकवाड, पंचायत समिती कृषि विभागाकडील श्री. दिनेश शेटये यांचेही प्रयत्न उल्लेखनिय असेच आहेत.

**राधानगरी संशोधन केंद्राकडूनही पाठपुरावा :**

राधानगरी संशोधन केंद्रातही घनसाळचे शुध्द बियाणे मिळणेसाठीचे संशोधन सुरू असून यापुढील काळात बियाण्यास मीठाची तसेच जैविक याप्रकारची १०० टक्के बीजप्रक्रिया राबवून सशक्त रोगप्रतिकारक बियाणे तयार करणेत येंणार असून या केंद्रामार्फत तांदूळ व भात याचे नमूने तपासणीसाठी भात संशोधन केद्रं, हैद्राबाद येथे पाठविणेत आलेले आहेत. यामुळे तांदळाची चव, चिवटपणा,त्यातील घटक,व सुवासिकपणा यांची माहिती मिळेल. घनसाळ सारख्या स्थानिक बियाण्यावर सर्व अंगाने प्रयोग होणारी ही राज्यातील पहीलीच जात आहे.असे राधानगरी संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा.चंद्रशेखर सरवटे व डॉ.शैलेश कुंभार यांनी व्यक्त केले.

**इतर संशोधने :**

आजरा-कोल्हापूर व्यतिरिक्त विदर्भामध्ये यासारख्या सुवासिक भात जातींची लागवड केली जाते.पुणे पॉलिप्रॉपिलीन या घटकामुळे भाताला वास येतो. बासुमतीप्रमाणेच घनसाळ सारख्या स्थानिक जातीमध्ये या घटकाचे प्रमाण जास्त आहे. पॉलिप्रॉपिलीन या घटकाचे व वासाचे पृथ्थकरण करण्यासाठी जनुकिय तंत्रज्ञानाव्दारे शोध घेणेचे काम पुणे विदयापिठाव्दारे सुरू आहे. आर्थिकदृष्टया उत्पादनासाठी या संशोधनाचा अत्यंत फायदा होणार आहे. विदयापिठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.ए.बी.नदाफ यांच्या मार्गदर्शनाखाली भातांच्या वासावर संशोधन सुरू आहे. यासाठी सारिका मथुरे, आसिफ शेख, दीपा भालेराव हे विदयार्थी काम करत आहेत. वृत्तपत्रातील जिल्हा परिषद कोल्हापूरकडून घेतलेल्या आजरा घनसाळ या योजनेबाबतच्या बातम्यांच्या आधारे या विदयार्थ्यांनी या योजनेअंतर्गत सुरू कामाची आज-यातील या गावांना भेटी देवून माहिती घेतली. तसेच घनसाळचे नमूने घेतले असून याबाबत समाधान व्यक्त करून यावर अधिक संशोधन करण्याचा मानस त्यांनी भेटीदरम्यान व्यक्त केला आहे.

केंद्राने प्रोटेक्शन ऑफ प्लान्ट व्हराइटीज ॲन्ड फार्मर्स राईटस ॲक्ट असा कायदा सन २००१ मध्ये संमत केलेला आहे. या कायदयात आपले मूळ, गावराण वाण तसेच विदयापिठांनी विकसित केलेले विविध वाण यांची नोंद करण्याची तरतूद आहे. त्यासाठी राष्ट्रीय जनुक कोष स्थापन केला आहे. शेतक-यांमध्ये यादृष्टीने जागृती होणे गरजेचे आहे.अशा वाणांची नोंदणी झालेस त्यांचे गुणधर्म तपासले जातात. त्यातील जनुकांची नोंद होते. हा वाण कुणाला वापरावयाचा असलेस त्याची रॉयल्टी भरावी लागते. त्यातून शेतक-यांच्या हक्कांचे जतन होते. तसेच हा वाण जतन करण्यासाठी उत्तेजन, प्रोत्साहन दिले जाते.मात्र तसा प्रयत्न शेतक-याकडून होताना दिसत नाही. या जातीसाठी राष्ट्रीय जनूक कोषामधून घनसाळसाठी अनुदानही मिळू शेकते.असे मत पदमश्री, पदमविभुषण यासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित **राष्ट्रीय जनुक कोषनिर्मिती निधीचे प्रमुख प्रा.माधव गाडगीळ** यांनी आपल्या कोल्हापूर भेटीमध्ये घनसाळ संवर्धनाबाबत सुरू असलेल्या या योजनेबाबत मत व्यक्त करताना सांगितले.

**प्रसिध्दी :**



या स्थानिक वाणसंवर्धनाच्या मोहिमेबाबत व्यापक प्रसिध्दी सर्वप्रथम दैनिक सकाळ,ॲग्रोवन ने सुरू केली.यामध्ये विविध लेखांमधून धनसाळ भााताचे महत्व,त्याची वैशिष्ठे, शासन पातळीवर या भाताच्या संशोधनाविषयी असलेली अनास्था आणि दुर्मिळ होत असलेल्या या भाताच्या आस्तित्वासाठी प्रयत्नाबबातची माहिती प्रसिध्द केली गेली. त्यानंतर लोकमत,पुढारी,सकाळ सारख्या दैनिकांमध्ये तसेच शेतीप्रगती सारख्या मासिकामध्ये घनसाळ लागवड कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी दिली गेली.

**घनसाळ संवर्धनासाठी केलेली पूर्वतयारी व सखोल अभ्यास,केलेल नियोजन पाहता यास चांगले यश मिळालेचे निदर्शनास येत आहे आणि हा वाणसंवर्धनाचा एक लढाच त्या निमित्ताने उभा राहिला आहे. हेच जिल्हा परिषदेने हाती घेतलेल्या या योजनेचे यश आहे. विधायकतेची ही श्रृंखला अशीच चालू राहीलेस घनसाळ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचेल यात शंका नाही.**